पहा:- या कार्यालयाचे परिपत्रक क्र.मळी १६८९/२६५८३/११-अ दिनांक ४ जानेवारी १९९०.

..........

परिपत्रक

क्रमांक मळी. ११९५/४९६५०/५[अ]                    मुंबई, २८ सप्टेंबर, १९९५.

आयुक्तांच्या असे निदर्शनास आले आहे की, साखर कारखान्यांकडून आसवनीतून उचल केलेल्या मळी/मद्यार्क वहातुक करणाऱ्या टँकरचे अनेक अपघात होतात. अशी प्रकरणे हाताळताना अपघातामध्ये जवळ जवळ सर्वच मळी वाहून गेल्याचे व नाश पावली असल्याचे आढळून आले आहे. त्याबाबत निरीक्षक/अधीक्षक यांचा अहवाल व इतर कागदपत्रे शिफारशी-सह सदर वाहून गेलेली मळी निर्लेखित करण्याकरिता आयुक्तांच्या आदेशार्थ प्रस्ताव सादर करतात. अशा कागदपत्रांची पडताळणी करता असेही नजरेस आले आहे की, काही ठराविक साखर कारखान्यांकडून उचल केलेल्या वा काही ठराविक घटकासाठी मळी वहातुक करताना अथवा काही ठराविक वहातुकदारांच्याच टँकरला अपघात झाल्याचे किंवा त्यांच्या टँकरमधून टँकर गळके असल्यामुळे वहातुकीत मळी वाहून गेल्याने त्रुटी आली आहे. या गोष्टीमुळे प्रत्यक्ष अपघात झाले असल्याबाबत शंका उत्पन्न होण्यास वाव रहातो. मळी चोरीच्या प्रकारामध्ये हाही एक प्रकार असल्याची दाट शंका आहे. टँकरमधून मळी अगोदरच काढून घेऊन, निम्मा उतरविलेला किंवा जुना टँकर पलटी झाल्याचे दर्शवून परस्पर मळी विक्री करण्यात येत असावी असाही दाट संशय आहे. म्हणून या पुढे ज्या जिल्हया-मध्ये मद्यार्क/मळीची वहातुक करणाऱ्या टँकरचा अपघात झाला असेल, त्या जिल्हा अधीक्षकांनी अपघाताची सूचना मिळताच तात्काळ [२४ तासाचे आत] अपघात स्थळाला स्वत: भेट देवून संपूर्ण अपघाताची पहाणी करावी व जर अपघात हा नैसर्गिक झाला असेल तर त्यांनी खाली नमूद केलेले प्रमाणपत्र द्यावे.

१] "मी श्री.--------------------------------------अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,----------------येथील मद्यार्क/मळी टँकर अपघाताची सूचना मिळताच दिनांक ----------------रोजी ------------वाजता भेट देवून सत्य परिस्थिती पाहिली.

२] मद्यार्क/मळी सदर अपघातामुळे संपूर्णपणे ------------लिटर्स/मे. टन नाश पावलेली आहे. अपघातात नाश पावलेली मळी/मद्यार्क जमीनीवर इतस्तत: पडलेली आहे.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

------------

२. अपघाताच्या स्थळाला भेट दिल्यावर भेट दिल्याची नोंद अधीक्षकांनी त्यांच्या दैनंदिनीमध्ये करणे आवश्यक आहे.

कृ. मा. पहा.

३. या कार्यालयाच्या दिनांक ४.१.९० च्या परिपत्रकान्वये विहित केलेल्या प्रपत्रात माहिती पाठविताना वरील प्रमाणपत्र पाठविण्यात यावे.

४. परिपत्रकाची पोच द्यावी.

[सुबोध कुमार]
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
२. सर्व जिल्हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
३. विभागीय उप आयुक्तांनी सुध्दा त्यांच्या कार्यक्षेत्राची ४०% अपघाताची स्वत: चौकशी करावी अशी अपेक्षा आहे.

[प.ला. सावंत]
सह आयुक्त,
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबईकरिता.

## मळी/मद्यार्क वाहणाऱ्या टँकरला झालेल्या अपघाताची माहिती.

१] अनुज्ञप्ती धारकाचे नाव व पत्ता :-

२] अनुज्ञप्तीचा प्रकार :-

३] आसवनी/साखर कारखाना [जेथून मळी/मद्यार्क वितरित करण्यात आला] त्याचे नाव :-

४] टँकरच्या ड्रायव्हरचे नाव व ड्रायव्हिंग लायसन्स नंबर :-

५] टँकर बरोबर असलेल्या इतर व्यक्तींची नावे व इतर तपशील. :-

६] टँकरचा नंबर, क्षमता इत्यादी :-

७] टँकरमध्ये किती मळी/मद्यार्क भरले होते ? व त्याचा वाहतूक पास क्र. व तारीख. वाहतूक पासाचा तपशिल गेट पासाची प्रत जोडणे. :-

८] टँकर कोठून कोठे व कोणत्या मार्गाने जाणार होता त्याचा तपशील. :-

९] अपघाताची तारीख वेळ व ठिकाणाचा पत्ता. :-

१०] अपघाताचे कारण :-

११] पोलिसांकडे गुन्हा नोंदविला आहे :– काय ? असल्यास नोंदीची तारीख व पोलिस स्टेशनचे नाव, पोलिस पंचनाम्याची प्रत व पोलिसांनी सदर गुन्ह्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती.

१२] सदर अपघातग्रस्त कैंरचा किंवा उत्पादक होता काय ? असल्यास :– त्यासंबंधात किंवा कंपनीने काय कार्यवाही केले त्याबाबत तपशील व कागदपत्राच्या प्रति.

१३] या विभागाच्या ज्या अधिकाऱ्याने :– सदर घटनेचा पंचनामा केला असेल त्याचे नाव, हुद्दा, पंचनामा, जाबजबाबाच्या प्रतीसह.

१४] :–

१५] पंचनामा करणाऱ्या अधिकाऱ्याचा :– शेरा

१६] सदर अपघात ज्या जिल्हा अधिकाऱ्याच्या हद्दीत घडून आला त्या जिल्ह्याच्या अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचे शेरे व सही.

१७] इतर काही शिल्लक तपशील.